# न्यायनिर्णय

## ( निकाल दिनांक 19 सप्टेंबर, 2018 )

1. मी आरोपीविरुध्द कलम 65 (ई) मुंबई प्रोव्हिबिशन कायदया प्रमाणे आरोप निशाणी क्रमांक 06 अन्वये निश्चीत केले. त्याने आरोप नाकारले व संपरीक्षेला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

2. आरोपीला दोषारोपपत्र व इतर कागदपत्रांच्या प्रती पुरविण्यात आल्या. याप्रमाणे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 207 ची पूर्तता करण्यात आली.

3. प्रस्तूत खटल्याच्या निकालाकरीता पुढील मुद्दे उपस्थित होतात. त्या मुददयांबाबतचे निष्कर्ष त्या मुद्दयांचे समक्ष, सकारण मी खालीलप्रमाणे नोंदवीत आहे.

| अ.क. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| {1} | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक 30 / 09 / 2017 रोजी दुपारी 03.30 वाजता मौजे दत्तमांजरी तांडा, ता.माहूर येथे आरोपी ही तिच्या ताब्यात विना परवाना बेकायदेशिररित्या 05 लिटर गावठी हातभट्टीची दारू किंमत 250 / – अंदाजे 250 / – रुपये ही चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगलेली आढळून आली ? | **... नाही** |
| {2} | आदेश ? | **... अंतीम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमीमांसा

4. आरोपीविरुध्द आरोप शाबीत करण्याकरिता अभियोग पक्षातर्फे पुरावा सादर करण्यात आला. मौखीक पुराव्यामध्ये जप्ती पंच रमेश किशन चव्हाण (सा.क्र.01) फिर्यादी / तपासिक अंमलदार विष्णु उत्तमराव मुटकुळे (सा.क्र.02), यांच्या मौखीक

पुराव्याचा समावेश होतो. आरोपीचे कलम 313(1)(ब) फौजदारी प्रक्रिया संहिता अंतर्गत बयाण नोंदविण्यात आले. अभियोग पक्षाचा व बचाव पक्षाचा युक्तीवाद ऐकून घेतला.

5. **मुद्दा क्रमांक 01 व 02 बाबत :–**

अभियोग पक्षातर्फे फिर्यादी / तपासिक अंमलदार विष्णु मुटकुळे (सा.क्र. 02) याचा मौखीक पुरावा सादर करण्यात आला. सदर साक्षीदाराने त्याच्या साक्षीत सांगीतले की, दिनांक 30.09.2017 रोजी ते पोहेकॉ म्हणून माहूर पोलीस स्टेशन येथे कार्यरत होते. सदर दिवशी त्यांना गुप्त माहीती मिळाली की, दत्तमांजरी तांडयाच्या दक्षिणेस सैलानी द–यामध्ये आरोपी ही हातभट्टीची दारू गाळत आहे. सदर माहीतीच्या आधारे ते दोन पंचाना सोबत घेवून छापा मारला असता आरोपी ही एक प्लास्टिकचे कॅन हातामध्ये घेवुन द–यातुन वर येत होती. त्याकॅन मध्ये 05 लिटर गावठी हातभट्टीची दारू मिळुन आली. जप्त मुद्देमालाचा पंचासमक्ष रितसर पंचनामा निशाणी क्र.14 प्रमाणे केला. त्यानंतर आरोपी विरुध्द निशाणी क्र.15 अन्वये फिर्याद दिली. त्याची छापील प्रत निशाणी 16 वर आहे. सदर गुन्हयाचा तपास त्याचेकडे देण्यात आल्यानंतर त्यांनी साक्षीदारांचे जवाब नोंदविले, निशाणी क्रमांक 17 प्रमाणे मुद्देमाल पावती तयार केली, जप्त मुद्देमालापैकी 180 एम. एलचा नमुना निशाणी क्र.18 वरील पत्र देवनू रासायनिक परीक्षणासाठी पाठविले. निशाणी क्र.19 प्रमाणे रासायनिक परीक्षण अहवाल हस्तगत केला. त्यानंतर आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. ते आरोपीला ओळखतात.

6. आरोपीच्या वतीने सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्यात आला. त्यामध्ये विचारण्यात आलेल्या सुचनावजा प्रश्नांना सदर साक्षीदाराने नकारार्थी उत्तर दिले. सदर साक्षीदाराच्या मौखीक पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, आरोपीच्या वतीने सदर साक्षीदाराच्या उलट तपासा दरम्यान कोणतीही महत्वपुर्ण कबूली अभिलेखावर आणण्यात आली नाही.

7. अभियोग पक्षातर्फे जप्ती पंच रमेश (सा.क्र.01) यांचा मौखीक पुरावा सादर करण्यात आला. सदर साक्षीदारांनी त्यांच्या साक्षीत अभियोग पक्षाला मदत केली नसून ते फितूर झाले. त्याने जप्ती पंचनाम्यावरील अनुक्रमांक 01 वर असलेली आपली स्वाक्षरी ओळखली. परंतु पंचनाम्यातील मजकूराबाबत त्यांना काहीएक माहीत नसल्याचे सांगीतले. साक्षीदार हे अभियोग पक्षाला मदत करीत नसल्याच्या कारणावरुन सरकारी वकील यांनी त्याला फितूर घोषीत करुन न्यायालयाच्या परवानगीने त्याचा कसून उलटतपास घेतला. परंतु उलटतपास दरम्यान काहीही सार्थक झाले नाही. सबब, अभियोग पक्ष रमेश (सा.क्र.01) याच्या पुराव्यातून जप्ती पंचनामा शाबीत करण्यास अपयशी ठरले.

8. अभियोग पक्षाच्या वतीने रासायनीक पृथक्करण अहवाल अभिलेखावर दाखल करण्यात आला. दुसरा जप्ती पंच सुभाष गोबरा राठोड हा अभियोग पक्षास सहायय करित नसल्यामुळे त्याची साक्ष नोंदविण्यात आली नाही. जरी फिर्यादी व तपासिक अंमलदाराने फिर्याद, जप्ती पंचनामा, मुद्देमाल पावती, पत्र, अहवाल सिध्द केले असले तरी जप्ती पंचनामा स्वतंत्र साक्षीदारा मार्फत सिध्द करण्यात आला नाही. जप्ती पंचाने अभियोग पक्षास समर्थन केले नाही. सबब, सदर जप्ती पंचनाम्यावर सुध्दा संशय निर्माण होतो आणि घटनेच्या वेळी आरोपीच्या ताब्यातून 05 लिटर गावठी हात भट्टीची दारू जप्त करण्यात आल्या होती या बाबीवरच प्रश्नचिन्ह निर्माण होतो. सबब, आरोपीविरुध्द सबळ व संशयापलीकडे ठोस असा गुन्हादर्शक पुरावा असल्याशिवाय आरोपीविरुध्द लावण्यात आलेले आरोप शाबीत झाले असे म्हणता येत नाही. उपरोक्त कारणांचा विचार करता मी मुद्दा क्रमांक 01 बाबत नकारार्थी निष्कर्ष नोंदवून मुद्दा क्रमांक 02 करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आ दे श**

{1} आरोपी मिराबाई बळीराम पवार याची मुंबई दारुबंदी कायदा कलम 65(ड) चे आरोपातून फौजदारी प्रकिया संहितेचे कलम 255(1) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

{2} आरोपीचे जामीनपत्र रद्द करण्यात येते.

{3} आरोपीने कलम 437–अ फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये 15,000 / – रूपयांची जामीन द्यावी.

{4} जप्त मुद्देमाल 05 लिटर गावठी हातभट्टीची दारू ही अपील कालावधी संपल्यानंतर राज्य उत्पादन शुल्क विभाग, नांदेड यांच्याकडे कायदेशीर विल्हेवाटीकरिता पाठविण्यात यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

दिनांकः– 18 / 09 / 2018.

( एफ. के. सिद्दीकी )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
माहूर

# Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Ajay Subhashrao Joshi |
| Court Name | : | Court of J.M.F.C., Mahur. |
| Date | : | 18/09/2018 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 18/09/2018 |
| Judgment uploaded on | : | 25/09/2018 |

XXXX